# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## ( कुलसचिव कार्यालय )

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

फोन/फॅक्स नं. ०७१३२-२२३१०४ email:-registrar.gondwanauniversity@gmail.com


जा.क्र. /गो.वि.ग/कुसका/४२५०(अ)/२०१७ दि. १५/०७/२०१७

## अधिसुचना

**विषय :- विभाग प्रमुखांची अभ्यासमंडळावरील निवडणूक (मतदान केंद्रावरील)**

महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१ मार्च, २०१७ पासुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ लागु केला आहे. त्यातील **कलम ४०(२) नुसार विविध अभ्यास मंडळाचे** गठण करणे आवश्यक असून त्यातील उपकलम ४० (२)(C) नुसार संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील संबंधीत विषयांच्या विभाग प्रमुखांच्या गटांमधुन तीन विभाग प्रमुख निवडून द्यावयाचे आहेत. यादृष्टीने सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील विविध विषयांच्या विभाग प्रमुखांची यादी तयार करून त्यातुन संलग्न महाविद्यालय व परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखांचा समावेश असलेला निर्वाचक गण(Electoral Roll) तयार करावयाचा आहेत.

तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना या अधिसूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात सूरू असलेल्या विविध विषयांच्या विभाग प्रमुखांची माहिती विद्यापीठाच्या www.unigug.org या संकेतस्थळावर Election portal अंतर्गत Collegiums link मध्ये विहीत केलेल्या नमुना प्रपत्रामध्ये आवश्यक असलेली सर्व माहितीची नोंद केल्यावर त्या प्रपत्राची प्रिंट काढून आवश्यक ते दस्तऐवज प्रपत्रासोबत जोडून एकत्रितरित्या विद्यापीठास शनिवार दिनांक ०५/०८/२०१७ रोजी किंवा त्यापुर्वी पोहचेल अशा बेताने सादर करावी.

प्रत्येक विभागप्रमुखाच्या माहितीसोबत खालील दस्तऐवज सांक्षाकीत करून जोडणे आवश्यक आहे.

१) व्याख्याता/सहायक प्राध्यापक/प्रपाठक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक म्हणुन विद्यापीठाच्या मान्यता पत्राची प्रत.
२) विभागप्रमुख म्हणुन नियुक्ती पत्राची स्वंयस्वाक्षांकीत प्रत.
३) पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असल्यास पदव्युत्तर अध्यापक म्हणुन विद्यापीठाच्या मान्यता पत्राची स्वयंस्वाक्षांकीत प्रत.
४) पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असल्यास पदव्युत्तर अध्यापक म्हणुन अनुभव प्रमाणपत्राची स्वंयस्वाक्षांकीत प्रत(एकुण पदव्युत्तर अध्यापक म्हणुन अनुभवाचा उल्लेख)

प्राधिकरणावर निवडुन द्यावयाच्या सदस्यांसंदर्भांत महराष्ट्र सर्वाजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या आहेत. ज्या महाविद्यालय/परिसंस्थेच्या, विभागप्रमुखांची माहिती विहीत मुदतीत प्राप्त होणार नाही त्या विभागप्रमुखाच्या नावाचा समावेश संबधीत गटाच्या मतदार यादीमध्ये करण्यात येणार नाही आणि यासाठी महाविद्यालयांचे प्राचार्य / विभागप्रमुख जबाबदार राहील, यांची नोंद घ्यावी.

विधी आणि विधानामधील कोणत्याही तरतुदीचा अर्थ काढण्यासंबंधात अडचण येत असल्यास विधी विधानाचे इंग्रजी प्रतीमधील तरतुद प्रमाण मानण्यात येईल.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का.) आणि
निवडणूक निर्णय अधिकारी

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे
मा. प्राचार्य, व मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा. संचालक